मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# भाजप ‘राष्ट्रवादी’त श्रेयवादाची लढाई!

## पिंपरी चिंचवडमध्ये विकासकामांचे उद्घाटन करण्यावरून वाद

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजनाचे श्रेय घेण्यासाठी राज्यातील सत्तेत एकत्र असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शह-काटशहाचे राजकारण सुरू असल्याचे दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवारी पिंपरी, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील केवळ आठ प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले. उर्वरित ११ प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजन भाजप पदाधिकाऱ्यांच्या आग्रहावरून दुसरे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्याचे नियोजित असल्याचे सूत्रांनी सांगितले. आमदार महेश लांडगे यांच्या भोसरी




मतदारसंघातील कामांचा त्यामध्ये समावेश असल्याचे सांगितले जाते.भाजपने पिंपरी- चिंचवड महापालिकेतील सत्ता अजित पवार यांच्याकडून २०१७ मध्ये खेचून घेतली होती. शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांचे विरोधक होते. पण, अजित पवार हेच शिवसेना-भाजप सरकारमध्ये सहभागी झाले. त्यामुळे शहर भाजपमध्ये अद्यापही नाराजी दिसून येत आहे. त्यांच्याशी जुळवून घेणे कठीण दिसत आहे. महापालिकेत भाजपची सत्ता असताना झालेल्या कामांचे श्रेय अजित पवार घेत असल्याची भावना भाजपमध्ये आहे. त्यामुळेच सर्व प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजन अजित पवार यांच्या एकट्याच्या हस्ते करण्यास भाजपचा विरोध दिसून आला.प्रशासनाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्याचे नियोजन केले. परंतु, तीन महिन्यांपासून प्रशासनाला तिघांची एकत्रित वेळ मिळाली नाही. नेत्यांसाठी उद्घाटने रखडल्याने महापालिकेच्या कारभारावर नागरिकांमधूनही नाराजी व्यक्त केली जात होती. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची एकत्र वेळ मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर प्रशासनाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवारी सात प्रकल्प आणि ऐनवेळी भक्ती-शक्ती चौक ते मुकाई चौक या ४५ मीटर रस्त्यावरील रेल्वे लाईनवरील उड्डाणपूलाचे उद्घाटन उरकून घेतले. तर, उर्वरित विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन दुसरे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्याचे नियोजन प्रशासनाकडून सुरू झाले आहे. सर्व प्रकल्प भोसरी विधानसभा मतदारसंघातील आहेत. लाइट हाऊस, जैववैद्यकीय घनकचरा विल्हेवाट प्रकल्प, कुदळवाडी-जाधववाडीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, चऱ्होलीतील निवासी गाळे, चिखलीत टाऊन हॉल, हॉटेल कचऱ्यापासून जैविक वायुनिर्मिती या प्रकल्पांचे उद्घाटन, तर मोशीत गायरान जागेवर रुग्णालय उभारणे, मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचे बायोमायनिंग टप्पा दोनचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्याचे नियोजन असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### अजित पवार – महेश लांडगे यांच्यात सूत जुळेना ?

**» राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये गेल्यानंतर भोसरीचे आमदार महेश लांडगे यांचा अजित पवार यांना तीव्र विरोध दिसून आला. महापालिका निवडणुकीवेळी ‘नको बारामती, नको भानामती’ असे फलक शहरात लावले होते. त्यातून पवार आणि लांडगे यांच्यातील वाढलेला राजकीय विरोध दिसून आला होता. भोसरी मतदारसंघातील कामांचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्तेच व्हावे, असा आमदार लांडगे यांचा आग्रह असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आणि महापालिका प्रशासनात आहे. शुक्रवारी पवार यांच्यासोबत उद्घाटन कार्यक्रमाला येणेही लांडगे यांनी टाळले. त्यामुळे पवार भाजपसोबत सत्तेत आल्यानंतरही त्यांचे आणि लांडगे यांचे सूत जुळले नसल्याची चर्चा आहे.**

# शहर भाजपमधील नाराजांचे बंड प्रदेशाध्यक्षांनी केले थंड..!

## माजी नगरसेवकांना प्रभागाची जबाबदारी द्या : चंद्रशेखर बावनकुळे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवड विधानसभेत शहराध्यक्ष पदावरून गटबाजी उफाळून आली होती. गेली कित्येक महिने सुरू असलेल्या अंतर्गत गटबाजीमुळे आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजपाला त्याचा फटका बसण्याची शक्यता होती. अखेर या नाराजांचे बंड भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी थंड केले आहे. बावनकुळे यांनी बाणेर येथे नुकतीच त्यासंदर्भात बैठक घेतली. लोकसभा निवडणूक आणि आगामी निवडणुक्यांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख नगरसेवकांना संघटनात्मक जबाबदारी व कोअर समितीत स्थान द्या, माजी नगरसेवकांना प्रभागाची जबाबदारी द्या, अशा सूचना शहर समितीला देण्यात आल्या. यावेळी नाराज गटाचे म्हणणे एकूण घेतले आणि त्यांची नाराजी दूर करण्यात ते यशस्वी झाले असल्याची माहिती मिळत आहे.भाजपचे



पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे यांची मुदत संपल्याने या पदासाठी अनेक नेते इच्छुक होते. अध्यक्षपदी चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख आणि माजी नगरसेवक शंकर जगताप यांची वर्णी लागताच एक गट नाराज झाला होता. त्यावेळी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे समर्थक माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, चंद्रकांत नखाते यांनी तशी नाराजी व्यक्त केली होती. १४ माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना पत्र देऊन राजकारणातील घराणेशाहीला विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने बाणेर येथे नाराज नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. बावनकुळे यांनी नाराजांचे म्हणणे ऐकून घेतले. या बैठकीस शहराध्यक्ष शंकर जगताप, स्थायी समितीचे माजी सदस्य शत्रुघ्न काटे, चंद्रकांत नखाते, संदीप कस्पटे, मोरेश्वर शेडगे, यशवंत भोसले, बाळासाहेब ओव्हाळ, मोना कुलकर्णी, सुनीता तापकीर आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बावनकुळे यांनी प्रत्येक नगरसेवकांशी वैयक्तिक संवाद साधत त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानंतर त्यांनी प्रमुख नगरसेवकांना संघटनात्मक जबाबदारी व कोअर समितीत स्थान द्या, माजी नगरसेवकांना प्रभागाची जबाबदारी द्या, अशा सूचना करत नाराजांची नाराजी दूर केली आहे.

# अंत्योदय संकल्प साकारण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे कार्य आदर्शवत

## भाजपतर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय यांना पुण्यतिथी निमित्त आदरांजली

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** सेवा, सुशासन आणि विकास यातून 'अंत्योदय' संकल्प साकारण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी दिलेली मूल्ये आपल्या कर्तव्याचा मार्ग बनून मार्गदर्शन करतात. त्यांचे कार्य नेहमीच आदर्शवत ठरणारे आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. अखंड मानवतावादाचे प्रणेते आणि कुशल संघटक आदरणीय पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप पक्ष कार्यालयात रविवारी आदरांजली अर्पण करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.यावेळी, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस शीतल शिंदे, अजय पाताडे, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, निलेश अष्टेकर, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेवक यशवंत भोसले, महिला मोर्चा सरचिटणीस वैशाली खाड्ये, बेटी बचाव बेटी पढाव संयोजिका प्रीती कामतीकर, पंचायत राज जिल्हा संयोजक अभिजित बोरसे, प्रदेश सदस्य महेश बारसावडे, दत्तात्रय यादव, ज्येष्ठ नागरिक महेश कुलकर्णी, पराग जोशी, कन्हैया मुंदडा यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चा / आघाडी / प्रकोष्ठ प्रमुख, मंडल पदाधिकारी,विधानसभा वॉरियर्स, शक्ति केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.



प्रखर राष्ट्रवादी आणि वंचितांच्या हक्काचे निर्माते, अत्यंत साधी जीवनशैली जगणाऱ्या आणि भारतीय संस्कृतीचा प्रवाह एकत्र आणणाऱ्या दीनदयाळजींचे जीवन हजारो भाजप कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी भारतीय संस्कृती आणि वारसा केंद्रस्थानी ठेवून देशाला पुढे नेण्याचा मार्ग दाखवला. पंडित दीनदयालजी यांचे जीवन हे राष्ट्रसेवेचे आणि समर्पणाचे महान प्रतीक आहे. कोणताही देश आपल्या संस्कृतीच्या मूलभूत कल्पना विसरून प्रगती करू शकत नाही, असा त्यांचा विश्वास होता. जेव्हा जेव्हा मानवतेच्या कल्याणाचा प्रश्न येतो तेव्हा पंडितजींची अखंड मानवतावाद आणि अंत्योदयाची तत्त्वे ध्रुव ताऱ्याप्रमाणे संपूर्ण मानवजातीला मार्गदर्शन करतील. त्यांची मूल्ये पक्षासाठी नेहमीच मार्गदर्शक राहतील, असे मत व्यक्त करीत केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती घर चलो अभियानाच्या माध्यमातून नागरिकापर्यंत पोहोचवून खऱ्या अर्थाने त्यांचा आदरांजली ठरणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रसंगी ज्येष्ठ नागरिक महेश कुलकर्णी यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कार्याचा उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे यांनी केले.

# हिंजवडीत बनावट पासपोर्ट बनवणारी टोळी अटकेत

## आरोपींनी १२५ लोकांकडून पारपत्र घेऊन ४८ बनावट पारपत्र बनविले

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** ब्रुनेई देशात जाण्यासाठी बनावट पारपत्र बनवणाऱ्या तिघांसह शिक्का बनवून देणाऱ्याला हिंजवडी पोलिसांनी अटक केली. आरोपींनी १२५ लोकांकडून पारपत्र घेऊन ४८ बनावट पारपत्र बनविले असून त्यासाठी पैसे घेतल्याचे उघडकीस आले आहे.विजय प्रताप सिंग (वय ४४), किसन देव पांडे (वय ३५, दोघे रा. मामुर्डी, मूळ – उत्तर प्रदेश), हेमंत सीताराम पाटील (वय ३८, रा. किवळे, मूळ – गवळेनगर, धुळे), किरण अर्जुन राऊत (वय ३४, रा. शाहूनगर, चिंचवड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत मनीष कन्हैयालाल स्वामी (वय ३२, रा. राजस्थान) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.आरोपी विजय, किसन आणि हेमंत हे पूर्वी आयात-निर्यात व्यवसायात काम करत होते. त्यांनी लोकांच्या फसवणुकीची नवीन पद्धत




शोधून काढली. भारतातून परदेशात जाणारे वेल्डर, वाहनचालक, प्लंबर यांना पारपत्र देण्यासाठी 'ब्ल्यू ओसियन मरीन' या नावाने कंपनी सुरू केली. लोकांकडून पारपत्र काढण्यासाठी पैसे घ्यायचे आणि पैसे घेऊन पळून जायचे. पारपत्र काढून देण्यासाठी लोकांकडून खरे पारपत्र घेतले जात होते. विश्वास संपादन करण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नागरिकांना सांगितले जात असे. त्यानुसार, नागरिकांकडून कागदपत्रे आल्यानंतर पारपत्रावर ब्रुनेई देशाचा बनावट शिक्का मारून त्यांना खरे पारपत्र असल्याचे भासवून दिले जात असे. काहीजण ब्रुनेई देशात जाण्यासाठी पारपत्र घेऊन विमानतळावर गेले असता तिथे हे शिक्के बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यातील काही लोकांनी दिल्ली येथील ब्रुनेई देशाच्या दुतावासात जाऊन खातरजमा केली. त्यावेळी त्यांच्या पारपत्रावर बनावट शिक्के मारल्याची खात्री झाली.आरोपींनी चिखलीतील युनिक प्रिंटर्स अँड झेरॉक्स या दुकानातून बनावट शिक्के तयार करून घेतले होते. पोलिसांनी दुकानदार किरण राऊत याला देखील अटक केली. त्याने दुकानावर 'या बसा शिक्के घेऊनच जा' अशा प्रकारची जाहिरात केली होती. पैशांच्या लालसेपोटी किरण याने हे बनावट शिक्के तयार करून दिले असल्याचे पोलिसांना सांगितले. त्याच्याकडून शिक्के बनविण्याची मशिन असा ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

# आपल्या कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका

## शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचे शरद पवार यांना साकडे

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष' हे नाव आणि 'पक्ष चिन्ह' अजित पवार गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिल्यानंतर संतप्त कार्यकर्त्यांनी पुण्यातील पक्ष कार्यालयातील अजित पवार यांचा नामफलक तोडला होता. तसेच अजित पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली होती. त्यानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांसमोर आले होते. कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करत वैयक्तिक लक्ष घालावे, असे साकडे खुद्द शरद पवार यांना शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी समक्ष भेट घेत घातले. पुण्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी शरद पवार यांची भेट घेतली.त्यावेळी प्रशांत जगताप यांनी



कार्यकर्त्यांसमवेत भेट घेऊन तक्रार केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार पात्र की अपात्र या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी चालू आहे. त्याचा निकाल प्रलंबित असतानाच निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय मागील आठवड्यात घेण्यात आला. त्यानंतर पुण्यातील शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयाबाहेर काळ्या फिती बांधुन निषेध व्यक्त करण्यात आला होता. गली गली मे शोर है अजित पवार चोर है, जो नाही झाला काकाचा, तो नाही होणार जनतेचा, अशा घोषणा दिल्या. तर पक्ष कार्यालयाबाहेर असलेल्या कोनशिलेवरील अजित पवार यांचे नाव हातोडी मारून फोडण्यात आले.या घटनेनंतर अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांनी प्रशांत जगताप यांना जाब विचारला, त्यामुळे काही काळ पक्ष कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पक्ष कार्यालय परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या सर्व घडामोडीनंतर दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप सुरूच आहे. तर आज शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप हे ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांना सभेच्या ठिकाणी सुखरूप पोहोचवणार्या कार्यकर्त्यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यासाठी शिवाजीनगर येथील निवासस्थानी घेऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी एकूणच सर्व घटनाक्रम सांगितला. त्याचवेळी अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन झाल्यानंतर एक व्यक्ती मला घरी भेटण्यास आला.ज्यांनी अजितदादांच्या नावाची पाटी फोडली आणि विरोधात घोषणाबाजी केली, त्या आंदोलनकर्त्यांवर हल्ला होऊ शकतो. याबाबत मला त्या व्यक्तीने माहिती दिली. पण या सर्व मुलांनी केलेल्या कृत्याबद्दल माफी देखील मागितली असून दिलगिरी व्यक्त केली आहे. ही सर्व मुले २५ ते २८ वयोगटातील आहे. या सर्वांच्या जिवाला काही होऊ नये. त्यामुळे या प्रकरणी दादांनी लक्ष घालावं आणि दादांनी मोठेपणा दाखवावा, असं गार्हाणं शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी शरद पवार यांच्या समोर मांडलं. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या समस्या देखील त्यांनी जाणून घेतल्या.त्यावेळी प्रशांत जगताप यांनी कार्यकर्त्यांसमवेत भेट घेऊन तक्रार केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार पात्र की अपात्र या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी चालू आहे. त्याचा निकाल प्रलंबित असतानाच निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय मागील आठवड्यात घेण्यात आला. त्यानंतर पुण्यातील शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयाबाहेर काळ्या फिती बांधुन निषेध व्यक्त करण्यात आला होता. गली गली मे शोर है अजित पवार चोर है, जो नाही झाला काकाचा, तो नाही होणार जनतेचा, अशा घोषणा दिल्या.

# पुणेकरांना पुण्येश्वर मंदिर मिळालेच पाहिजे!

## सुनील देवधर यांचा निर्धार, 'नमो पुणे अभिवादन बाईक रॅली' उत्साहात

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे राम मंदिर उभे राहू शकले असून, ज्याप्रमाणे देशाला राम मंदिर मिळाले, त्याप्रमाणे पुणेकरांना देखील पुण्येश्वर मंदिर मिळालेच पाहिजे असा निर्धार भाजपचे राष्ट्रीय नेते सुनील देवधर यांनी व्यक्त केला. रविवारी, ११ फेब्रुवारी रोजी सुनील देवधर यांच्या नेतृत्वात पुण्यात 'नमो पुणे अभिवादन बाईक रॅली'चे



आयोजन करण्यात आले होते, त्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.या बाईक रॅलीत ३ हजारांहून बाईकधारक व ५ हजारांहून अधिक पुणेकर रामभक्त सहभागी झाले होते. त्यात महिला व युवतींची लक्षणीय संख्या होती. पुण्यातील नागरी समस्यांचे निराकरण, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आम्ही संकल्पबद्ध असून, पुण्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे विकसित शहर बनवण्यासाठी आपण सर्वांनी संकल्प व शपथ घेवूया असे, सुनील देवधर यांनी याप्रसंगी बोलताना केले. त्याचप्रमाणे देशाला भव्य राम मंदिर दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे त्यांनी आभार देखील व्यक्त केले. भाजप कार्यालय, कृष्णसुंदर गार्डन, डीपी रोड, एरंडवणे येथून या रॅलीला सुरुवात झाली. याप्रसंगी भाजपचे युवा नेते कुणाल टिळक, राजे शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष व भाजप शहर चिटणीस महेश पवळे आणि दिनेश होले यांच्यासह हजारोंच्या संख्येने पुणेकरांनी बाईक रॅलीत सहभाग घेतला. डी पी रोडवरून रॅली म्हात्रे पूल – शास्त्री रोड- माधवराव पेशवे रोड – बाजीराव रोड – शनिवार वाडा – मॉडर्न कॅफे – जंगली महाराज रोड – एफ. सी. रोड – ज्ञानेश्वर पादुका चौक मार्गे मॉडर्न इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या ठिकाणी येऊन सांगता झाली. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांनी राम खिचडीचा देखील आस्वाद घेतला.

# फलटण ते पंढरपूर रेल्वेला गती!

## लवकरच कामाला मंजुरी मिळण्याची चिन्हे

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

फलटण ते पंढरपूर रेल्वेमार्गाला अखेर गती मिळण्याची चिन्हे आहेत. मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक राम करण यादव यांनी या प्रकल्पाचा नुकताच आढावा घेतला आहे. त्यामुळे लवकरच या रेल्वे मार्गाला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. हा रेल्वेमार्ग १०५ किलोमीटरचा असणार आहे. सरव्यवस्थापक यादवी यांनी फलटण स्थानकाची पाहणी करून भविष्यातील विकास आणि प्रकल्पांच्या सद्य:स्थितीवर नुकतीच चर्चा केली. यावेळी खासदार रणजित नाईक निंबाळकर, उपस्थित होते. यानंतर यादव यांनी लोणंद ते फलटण रेल्वे गाड्यांचा वेग वाढवणे, बहुप्रतिक्षित फलटण ते बारामती विभाग आणि फलटण ते पंढरपूर नवीन मार्गिका सुरू करणे यासह प्रकल्पांबाबत चर्चा केली. नीती आयोगाच्या मंजुरीनंतर पुढील मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत या प्रकल्पांना मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पांचा खर्च एकूण २ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त आहे.यादव यांनी नीरा नदीवरील पुलाच्या प्रकल्पाची पाहणी केली. हा पूल ७ स्पॅन गर्डर्ससह बांधला जाणार आहे. मध्य रेल्वेच्या मनमाड कार्यशाळेत पूल तयार करण्याचे काम सुरू आहे. तो लवकरच तयार होणार आहे. पुलाच्या बांधकामाचे कंत्राट यापूर्वीच देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या पुलाच्या कामाला गती मिळणार आहे. या पाहणीवेळी रेल्वेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी ((निर्माण) अवनीशकुमार पांडे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे, तसेच मुख्यालय आणि पुणे विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.फलटण ते पंढरपूर रेल्वेमार्गाला अखेर गती मिळण्याची चिन्हे आहेत. मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक राम करण यादव यांनी या प्रकल्पाचा नुकताच आढावा घेतला आहे. त्यामुळे लवकरच या रेल्वे मार्गाला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. हा रेल्वेमार्ग १०५ किलोमीटरचा असणार आहे. सरव्यवस्थापक यादवी यांनी फलटण स्थानकाची पाहणी करून भविष्यातील विकास आणि प्रकल्पांच्या सद्य:स्थितीवर नुकतीच चर्चा केली. यावेळी खासदार रणजित नाईक निंबाळकर, उपस्थित होते. यानंतर यादव यांनी लोणंद ते फलटण रेल्वे गाड्यांचा वेग वाढवणे, बहुप्रतिक्षित फलटण ते बारामती विभाग आणि फलटण ते पंढरपूर नवीन मार्गिका सुरू करणे यासह प्रकल्पांबाबत चर्चा केली. नीती आयोगाच्या मंजुरीनंतर पुढील मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत या प्रकल्पांना मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पांचा खर्च एकूण २ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त आहे.यादव यांनी नीरा नदीवरील पुलाच्या प्रकल्पाची पाहणी केली. हा पूल ७ स्पॅन गर्डर्ससह बांधला जाणार आहे.



# अयोध्येपाठोपाठ लवकरच मथुरेत श्रीकृष्ण मंदिर होईल

## देवेंद्र फडणवीस यांनी गीत- भक्ती अमृत महोत्सव कार्यक्रमाला लावली हजेरी

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अयोध्या, काशी आणि मथुरा ही पवित्र ठिकाणे आहेत. ज्या पद्धतीने श्रीराम जन्मभूमीचा प्रश्न मार्गी लागला, त्याचप्रमाणे कायदेशीररीत्या मथुरा येथील श्रीकृष्ण मंदिर देखील निर्माण होईल, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. देवेंद्र फडणवीस हे आळंदीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांनी गीत- भक्ती अमृत महोत्सव कार्यक्रमाला हजेरी लावली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, आयोध्या काशी आणि मथुरा ही ठिकाणे अत्यंत पवित्र आहेत. ज्या पद्धतीने राम जन्मभूमी निर्माण झाली, त्या पद्धतीने मथुरा येथे कृष्ण मंदिर निर्माण व्हावे ही लोकांची अपेक्षा आहे. मला विश्वास आहे, ज्या पद्धतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत राम मंदिर निर्माण झाले. त्याच पद्धतीने श्रीकृष्ण मंदिर सौहार्दपूर्ण वातावरणात निर्माण होईल, असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. आळंदी मध्ये गीत- भक्ती अमृत महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमाला फडणवीस आले असता त्यांनी हे मत व्यक्त केले.दरम्यान, संजय राऊत सातत्याने करत असलेल्या टीकेला त्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. कोण संजय राऊत? ते काय मोठे नेते आहेत का? मोठे नेते असतील तर मला विचारा अशा शब्दांत त्यांनी राऊत यांच्यावर टीका केली. आचार्य प्रमोद कृष्णम यांना काँग्रेसने निलंबित केल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी काँग्रेसवर टीका केली. त्यांचा दोष येवढाच आहे की त्यांनी काँग्रेसला सांगितले की राम आणि राम मंदिराला विरोध करू नका. त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई झाल्याचे फडणवीस म्हणाले.अयोध्या, काशी आणि मथुरा ही पवित्र ठिकाणे आहेत. ज्या पद्धतीने श्रीराम जन्मभूमीचा प्रश्न मार्गी लागला, त्याचप्रमाणे कायदेशीररीत्या मथुरा येथील श्रीकृष्ण मंदिर देखील निर्माण होईल, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. देवेंद्र फडणवीस हे आळंदीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

